# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली


महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**

**(महाविद्यालयीन विभाग)**

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५(महा.) फोन:०७१३२.२१६५५४,२२३१०४,२१६५९४फॅक्स रू ०७१३२,२२३३२२

**Email : arcollegesectiongug48@gmail.com web:gondwana.digitaluniversity.ac web:gondwanauniversity.org**

(डॉ. जे. व्ही. दडवे)
संचालक (प्रभारी)


क्रमांक/महा.वि/गो.वि./ ६५ /२०१६
दिनांक : ९/१०/२०१६

## परिपत्रक

सर्व संबधीतांच्या माहिती करीता कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ दि. २७.०९.२०११ रोजीच्या पत्रानुसार महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ३ पोटकलम (२) अन्वये गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली स्थापीत झालेले आहे.

या परिपत्रकाद्वारे गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या कडून प्राप्त झालेल्या पत्राची माहिती अवगत करण्याकरिता सोबत जोडलेले आहे.

कळावे,

(डॉ. जे. व्ही. दडवे)
संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतीलीपी माहितीकरिता अग्रेषित:–

१. मा.कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
२. प्राचार्य, गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
३. मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुबंई

सहायक कुलसचिव (म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


कालमर्यादीत दि.२७.१०.२०१६

क्रमांक:२/एनजीसी/चौकशी व कार्यवाही/२०१६/2956

दिनांक : 15 OCT 2016

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती, नागपुर.

विषय : राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या तपासणीबाबत.

संदर्भ : १. संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/चौकशी व कार्यवाही/२०१६/४७०, दि.०७.०४.२०१६

२. संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/चौकशी व कार्यवाही/२०१६/६४०, दि.१७.०५.२०१६

३. शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२३९/तांशि-४, दि.१४.०९.२०१६

४. शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२७७(भाग-२)/तांशि-४, दि.१६.०९.२०१६

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या मानकांनुसार राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांची तपासणी विभागीय कार्यालयांमार्फत संचालनालयाकडुन करण्यात आली आहे. सदर तपासणीमध्ये काही संस्थांमध्ये परिषदेच्या मानकांनुसार जमीन, इमारत, पुरेसा शिक्षक वर्ग व पायाभुत सोयीसुविधा उपलब्ध नसल्याबाबतची वस्तुस्थिती निदर्शनास आली आहे.

संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये आपल्या विभागीय कार्यालयाच्या कार्यकक्षेतील अभियांत्रिकी महाविद्यालयास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मान्यता दिल्यानंतर शासनाने निर्गमीत केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्ती आणि संचालनालयाने निर्गमीत केलेल्या मान्यता पत्रातील अटी, शर्ती यांची पुर्तता संचालनालयास सादर केलेल्या शपथपत्रात नमुद आहे किंवा कसे? त्याचप्रमाणे ज्या महाविद्यालयांमध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकांनुसार पुर्तता झाली नाही, अशा महाविद्यालयाने चुकीची व दिशाभुल करणारी माहिती दिली असल्याचे सिध्द झाल्यास आवश्यकतेनुसार अशा संस्थांवर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांचे अध्यक्षतेखाली दि. ४.०४.२०१६ रोजी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांचे संचालक, विद्यापीठ विकास मंडळ झालेल्या बैठकीमध्ये काही मुद्यांवर तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले होते. संदर्भ क्र.३ व ४ मधील पत्रांमध्येही महाविद्यालयाने चुकीची व दिशाभुल करणारी माहिती दिली असल्याचे सिध्द झाल्यास आवश्यकतेनुसार अशा संस्थांवर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश आहेत.

तरी सदर प्रकरणी विभागीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील किती संस्थांनी अशा प्रकारे चुकीची माहिती सादर करुन शासनाची दिशाभूल केली आहे. तसेच आपल्या विभागीय कार्यालयाकडुन सदर संस्थांवर कोणती

कारवाई करण्यात आली याबाबतचा अहवाल **विनाविलंब संचालनालयास दि.२७.१०.२०१६** पर्यंत सादर करण्यात यावा.

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीकरीता सादर
२) मा. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
३) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व तात्काळ कार्यवाहीसाठी.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र.१० यांना माहितीकरीता.